# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.05.2025** **वार:बुधवार**

---

1. विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी देशातील प्रत्येकाचं योगदान आवश्यक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. महाराष्ट्रातील सहा मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान
3. परदेशी विद्यार्थ्यांसाठी नवीन व्हिसा मुलाखतींचं वेळापत्रक बंद करण्याचे अमेरिकेचे आदेश आणि
4. महाराष्ट्रासह देशातल्या विविध भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज

**पंतप्रधान- भूज**

भारताविरोधात पाकिस्तानने सुरु केलेले हेतुपुरस्सर युद्ध ही शेजारी राष्ट्राची सुनियोजितयुद्धनीती असल्याचं अलीकडच्या घटनांवरून स्पष्ट होत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमधल्या महात्मा मंदिर इथल्या एका सभेलासंबोधित करताना ते बोलत होते. सहा मे रोजी घडलेल्या घटनांनंतर भारताला दहशतवादीकारवायांचे पुरावे देण्याची गरज नसल्याचं सांगून हे पुरावे सीमेपलीकडूनच मिळत असल्याचंते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांना पाकिस्तानमध्येराजकीय सन्मान दिला गेला,त्यांना शहीद म्हणून गौरवण्यात आलं, पाकिस्तानसैन्यानं त्यांना सलामी दिली. हे पुरेसे बोलके असल्याचं ते म्हणाले. गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर मोदींच्या हस्ते साडेपाच हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पाचं उद्घाटन तसंच पायाभरणी झाली.

**पंतप्रधान**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी देशातील प्रत्येकाचं योगदान आवश्यक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल गुजरातमध्ये गांधीनगर इथं एका कार्यक्रमात बोलताना सांगितलं. देशातील प्रत्येकानं स्वदेशी उत्पादनं खरेदी करण्याला प्राधान्य द्यावं असं आवाहन करताना पंतप्रधान म्हणाले......

सचमुच में ऑपरेशन सिंदूर के लिए एक नागरिक के नाते मुझे एक काम करना है। आप घर में जाकर सूची बनाइए कि आपके घर में 24 घंटे में सुबह से दूसरे दिन सुबह तक कितनी विदेशी चीजों का उपयोग होता है। आपको पता ही नहीं होता है, देश को अगर बचाना है, देश को बनाना है, देश को बढ़ाना है, तो ऑपरेशन सिंदूर यह सिर्फ सैनिकों के जिम्मे नहीं है। ऑपरेशन सिंदूर 140 करोड़ नागरिकों की जिम्मे है। देश के विकास के लिए भागीदार बने, दायित्व संभाले। हम इतना तय कर लें कि 2047, जब भारत के आजादी के 100 साल होंगे। विकसित भारत बनाने के लिए तत्काल भारत की इकोनॉमी को 4 नंबर से 3 नंबर पर ले जाने के लिए अब हम कोई विदेशी चीज का उपयोग नहीं करेंगे। हम गांव-गांव व्यापारियों को शपथ दिलवाएं, व्यापारियों को कितना ही मुनाफा क्यों ना हो, आप विदेशी माल नहीं बेचोगे।

**पद्मपुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात राज्यातील सहा मान्यवरांना सन्मानित करण्यात आलं. माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांना लोककार्यासाठी मरणोत्तर

पद्मभूषण सन्मान प्रदान करण्यात आला. शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, डॉक्टर विलास डांगरे, आणि सुभाष शर्मा यांना पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला. या वर्षी सरकारनं 139 पद्म पुरस्कारांची घोषणा केली होती, यामध्ये सात पद्मविभूषण, 19 पद्मभूषण आणि 113 पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.

**राजनाथ-समीक्षा**

संरक्षणविषयक औद्योगिक पाया भक्कम करण्यासाठी आणि संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. संरक्षण उद्योगातील आठ सार्वजनिक उपक्रमांच्या कामगिरीचा एका बैठकीत आढावा घेताना ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय सशस्त्र दलांच्या तयारीचं प्रदर्शन करणारे मंच आणि तंत्रज्ञान विकसित करण्यात या उपक्रमांसह संपूर्ण संरक्षण उद्योगानं बजाविलेल्या भूमिकेचं त्यांनी कौतुक केलं. सध्याची भू-राजकीय परिस्थिती आणि अलीकडील घडामोडी लक्षात घेता, सिंह यांनी या उपक्रमांना आधुनिक युद्धाच्या उदयोन्मुख क्षेत्रात संशोधन आणि विकासावर अधिक लक्ष केंद्रित करून नवीनतम तंत्रज्ञानावर आधारित त्यांचं उत्पादन वाढविण्याचे निर्देश दिले. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडला महारत्न दर्जा आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडला नवरत्न दर्जा मिळाल्याबद्दल सिंग यांनी अभिनंदन केलं.

**आयएमसी-शिंदे**

केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी इंडिया मोबाईल काँग्रेसच्या 9 व्या अधिवेशनासाठी 'इनोव्हेट टू ट्रान्सफॉर्म' ही संकल्पना सादर केली आहे. यावर्षीची संकल्पना भविष्य घडवण्यात आणि उद्योग आणि पायाभूत सुविधांपासून ते समाज आणि शाश्वततेपर्यंतच्या क्षेत्रांमध्ये वास्तविक, परिवर्तनकारी बदल घडवून आणण्यात नवोपक्रमाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करणारी आहे.

**विद्यार्थी-अमेरिका**

अमेरिकेत येण्यास इच्छुक अर्जदारांच्या सोशल मीडिया विवरणाची कडक तपासणी करण्याचा विचार करत असल्यानं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी अमेरिकन दूतावास आणि कॉन्सुलर कार्यालयांना विद्यार्थी अर्जदारांसाठी नवीन व्हिसा मुलाखतींचं वेळापत्रक बंद करण्याचे आदेश दिले आहेत. परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकन शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रतिबंधित करण्यासाठी विद्यमान तपासणी व्यापक करण्यात येत आहे. यापूर्वी, ट्रम्प प्रशासनानं हार्वर्ड विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय बेकायदेशीर आणि अनुचित असल्याचं सांगून विद्यापीठानं त्याचा निषेध केला होता.

**परकीगुंतवणूक**

देशातगेल्या आर्थिक वर्षात 81अब्ज अमेरिकन डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. आधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ती 14 टक्के अधिक आहे. वाणिज्य आणि उद्योगमंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनानुसार, यापैकी 19 टक्के गुंतवणूक सेवा क्षेत्रात झाली. तर संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर क्षेत्राला16 टक्के आणि व्यापार क्षेत्राला 8 टक्के लाभ झाला असल्याचं नमूद केलं आहे. सरकारनं परकीय गुंतवणूकदारांसाठी अनुकूल धोरण लागू केलं आहे, याअंतर्गत बहुतांश क्षेत्रं 100 टक्के एफडीआयसाठी खुली आहेत.

**सर्वपक्षीयशिष्टमंडळ**

भारताच्या दहशतवाद विरोधी भुमिकेवर भर देण्याच्या राजनैतिक प्रयत्नांचा भाग म्हणून सात सर्वपक्षीय शिष्टमंडळांपैकी द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ काल ग्रीसमध्ये पोहोचलं. तिथं वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन या शिष्टमंडळानं भारताच्या सीमापार दहशतवादाविरोधातील शून्य सहिष्णुता धोरणावर भर दिला. स्लोव्हेनिया आणि रशिया दौऱ्यानंतर ग्रीसमध्ये पोहोचलेल्या शिष्टमंडळानं तिथल्या भागधारकांना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती देत विस्तृत चर्चाही केली.

पाकिस्तान-पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका आंतरराष्ट्रीय समुदायपर्यंत पोहोचवण्यासाठी 33 देशांना ही शिष्टमंडळं भेट देत आहेत.

**पारंपरीकऔषधेजिनिव्हा**

एकात्मिक आरोग्य सेवा दृष्टीकोनाचा भाग म्हणून पारंपरिक औषध व्यवस्था बळकट करण्यासाठी भारतानं दृढ वचनबद्धता व्यक्त केली आहे. स्वित्झर्लंडमध्ये जिनेव्हा इथं आयोजित 78 व्या जागतिक आरोग्यसभेत भारतानं ही भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. भारताच्या वतीनं बोलताना जिनेव्हा इथले संयुक्त राष्ट्रांचे स्थायी प्रतिनिधी अरिंदम बागची यांनी नवीन जागतिक आरोग्य संघटनेनं जागतिक पारंपारिक औषध धोरण 2025 -2034 स्वीकारल्याचे स्वागत केले आणि राष्ट्रीय आणि जागतिक आरोग्य चौकटीत पुराव्यावर आधारित पारंपारिक पद्धती अंतर्भूत करण्याच्या भारताच्या प्रयत्नांची माहिती दिली.

**CAC-NAPS विद्यावेतन**

केंद्रीय अप्रेंटिसशिप परिषदेनं राष्ट्रीय अप्रेंटिसशिप प्रोत्साहन योजना- NAPS आणि राष्ट्रीय अप्रेंटिसशिप प्रशिक्षण योजना- NATS अंतर्गत तरुणांना देण्यात येणाऱ्या विद्यावेतनाध्ये 30 टक्के वाढ करण्याची शिफारस केली आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री जयंत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं परिषदेच्या 38 व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय अधिसूचित झाल्यानंतर, या दोन्ही योजनांअंतर्गत विद्यावेतन विद्यमान 5 हजार आणि 9 हजारांवरून 6 हजार 800 आणि 12 हजार 300 पर्यंत वाढेल. विद्यार्थ्यांचं शिक्षण सोडण्याचं प्रमाण कमी करणं आणि विविध क्षेत्रांमध्ये अधिक उमेदवारांना आकर्षित करणं हा या शिफारशीचा उद्देश आहे.

**सराव**

संचलनातील एकसूत्रता आणि लढाईची तयारी वाढवण्याच्या दृष्टीनं एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, भारतीय सैन्य आणि आसाम रायफल्सनं अरुणाचल प्रदेशमध्ये संयुक्त प्रशिक्षण सराव यशस्वीरित्या पार पाडला. आठवडाभर चालणाऱ्या या प्रशिक्षणाचा उद्देश दोन्ही दलांमधील समन्वय आणि आंतरकार्यक्षमता वाढवणं, शस्त्रास्त्र प्रणाली, उपकरणे हाताळणी आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण यावर लक्ष केंद्रित करणे हा होता. अरुणाचल प्रदेशच्या आव्हानात्मक भूभागामुळं या सरावासाठी एक उपयुक्त पार्श्वभूमी मिळाली आणि सीमा सुरक्षा आणि बंडखोरीविरोधी आव्हानांना सामरिक प्रतिसाद देण्याचा अभ्यास झाला. दरम्यान, मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी अरुणाचल प्रदेशच्या कठीण आणि महत्वाच्या भूभागात या संयुक्त प्रशिक्षण सरावाच्या यशस्वी आयोजनाचे कौतुक केलं.

**निवडणूक-द्वैवार्षिक निवडणूक**

निवडणूक आयोगानं राज्यसभेच्या आठ जागांसाठी होणाऱ्या द्वैवार्षिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये तामिळनाडूतील सहा आणि आसाममधील दोन जागा समाविष्ट आहेत. पुढील महिन्याच्या दुसऱ्या तारखेला अधिसूचना जारी केली जाईल आणि मतदान 19 जून रोजी होईल. त्याच दिवशी मतमोजणी होईल.

**आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप**

दक्षिण कोरियातील गुमी इथं उद्यापासून सुरू होणाऱ्या आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धांमध्ये 60 सदस्यांचं भारतीय पथक सहभागी होणार आहे. भारतीय पथकात अनेक ऑलिंपियन, आशियाई क्रीडा पदक विजेते आणि राष्ट्रीय विक्रमधारकांचा समावेश आहे. यामध्ये स्टीपलचेस प्रकारासाठी अविनाश साबळे स्पर्धेत उतरणार आहे.

**आयपीएल क्रिकेट**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं लखनौ सुपर जाएन्ट्सचा 6 गडी राखून पराभव केला. लखनौनं ऋषभ पंतच्या नाबाद शतकाच्या जोरावर बंगळुरूसमोर 228 धावांचं उद्दिष्ट ठेवलं होतं. बंगळुरूनं 8 चेंडू राखून हे आव्हान पार केलं. बंगळूरूच्या विराट कोहलीनं 54 तर जितेश शर्मानं 33 चेंडूत तडाखेबंद 85 धावा केल्या.

**<u>मान्सून</u>**

भारतीय हवामान खात्यानं यावर्षीच्या मान्सूनचा दुसऱ्या टप्प्यातील अंदाज काल जाहीर केला. यावर्षी जून ते सप्टेंबर या काळात महाराष्ट्रासह देशातल्या विविध भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान येत्या 24 तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

**<u>कर्नाटक</u>**

कर्नाटकच्या किनारी आणि पश्चिम घाट जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळं सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. दक्षिण कन्नड, उडुपी, कोडगु, शिवमोगा आणि चिकमंगलूर या जिल्ह्यांना मान्सूनचा फटका बसत आहे. महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये काल पावसाचा जोर कायम होता.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.